




दैनिक **महाराष्ट्राचा बुलंद आवाज** • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २५३ •शुक्रवार,दि.१२ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955




# गोदाकाठावरील ३२ गावांचे पुर्नवसन करा: आ. विजयसिंह पंडित

## विधानभवनात मांडली लक्षवेधी ; मंत्री मकरंद जाधव यांनी दिले बैठकीचे आश्वासन

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांनी नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात गेवराई विधानसभा मतदार संघातील गोदावरी काठच्या ३२ पूरग्रस्त गावांचे पुर्नवसन करण्याची मागणी लक्षवेधीद्वारे मांडली. लक्षवेधीला उत्तर देताना मदत व पुर्नवसन मंत्री ना. मकरंद जाधव पाटील यांनी अधिवेशन संपल्यानंतर या बाबत मुंबईमध्ये बैठक घेऊन पुर्नवसनाचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या गोदावरी नदीकाठावरील ३२ पुरग्रस्त गावांच्या पुर्नवसनाचा प्रश्न लक्षवेधीद्वारे मांडला. यावेळी बोलताना आ. पंडित म्हणाले की, नाशिक तसेच जायकवाडी धरण क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्यास जायकवाडी धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग गोदावरी नदीत सोडावा लागत असून यामुळे गेवराई विधानसभा मतदार संघातील पाथरवाला, गुंतेगाव, सुरळेगाव, पांचाळेश्वर, राक्षसभूवन (शनिचे), गुळज यांच्यासह एकूण ३२ गावांना दरवर्षी पुराचा गंभीर धोका निर्माण होतो. सन २००६ मध्ये जायकवाडी धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आल्याने गोदावरी नदीस महापूर आला आणि गेवराई तालुक्यातील गोदाकाठच्या ३२ गावांमधील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होवून घरांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले. अनेक नागरीकांना स्थलांतर करावे लागले. त्या अनुषंगाने तत्कालीन सरकारने सदर ३२ गावांचा पुर्नवसन करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु आज १९ वर्षे उलटूनही पुर्नवसनाचा प्रश्न कायम प्रलंबित आहे. यावर्षी २०२५ मध्येही जायकवाडी धरणातून मोठ्या ▶ उर्वरित पान २ वर

**● आ. विजयसिंह पंडित यांनी मांडलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना मदत व पुर्नवसन मंत्री ना. मकरंद जाधव पाटील म्हणाले की, हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर मुंबई येथे या बाबत सविस्तर बैठक घेण्यात येईल. बैठकीला आ. विजयसिंह पंडित यांच्यासह मराठवाड्यातील आमदारांना निमंत्रित करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. गेवराई विधानसभा मतदार संघातील गोदाकाठच्या पुरग्रस्त ३२ गावांच्या पुर्नवसनाचा प्रश्न आ. विजयसिंह पंडित यांनी हिवाळी अधिवेशनात मांडल्यामुळे गोदाकाठावरील गावातील शेतकरी आणि नागरीकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.**

# अभिलेखे कक्षाचे प्रमुख एसीबीच्या रडारवर;

## सफाई कामगाराकडे जबाबदारी कशी?

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिकेमध्ये गुंठेवारीची सत्यप्रत देण्यासाठी सफाई कामगार आशिष मस्के याला १ हजार रुपयांची लाच घेताना एसीबीने मंगळवारी रंगेहाथ पकडले. या कारवाईत रात्री उशिरा आणखी एक मोठा ट्विस्ट आला आहे.मस्के याच्यासोबत लाच घेण्यासाठी प्रोत्साहन दिल्याबद्दल पाबळे नामक खासगी व्यक्तीला सहआरोपी करण्यात आले



असून, तो सध्या फरार आहे. या कारवाईतील सर्वात मोठा प्रश्न म्हणजे, सफाई कामगार असलेल्या आशिष मस्के याच्याकडे कसलेही अधिकृत आदेश नसताना त्याला पालिका अभिलेखे कक्षात कामाची जबाबदारी कशी देण्यात आली? राजकीय व्यक्तींच्या आशीर्वादाने आणि काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अर्थपूर्ण सहकार्यानेच तो या कक्षात कार्यरत होता. त्यामुळे, ज्या विभागप्रमुखाने आदेश नसतानाही कामगाराला ही जबाबदारी दिली, ते आता थेट एसीबीच्या रडारवर आले आहेत. ▶ उर्वरित पान २ वर

**● एकजण फरार**

**आशिष मस्के सोबत पाबळे नामक खासगी व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे. त्याने लाचेसाठी प्रोत्साहन दिले असून, तो सध्या फरार आहे. या प्रकरणात तपासात ज्यांच्यावर संशय वाटेल, त्यांना चौकशीसाठी बोलावले जाईल. – सोपान चिट्टमपल्ले, उपअधीक्षक एसीबी बीड**

# ज्ञानराधा क्रेडिट सोसायटीची वसुली करायची कशी?

## प्रशासकापुढे पेच, 3696 कोटींपैकी 3545 कोटींचे कर्ज कुटेकडेच

**बीड । प्रतिनिधी**

सुरेश कुटे व अर्चना कुटे दांपत्याच्या ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या तिजोऱ्यांत पावणेचार लाख ठेवीदारांनी २ हजार ९५९ कोटी रुपयांच्या ठेवी ठेवल्या. मात्र, कुटेने या सगळ्या ठेवी स्वत:च्याच उद्योगांना कर्ज म्हणून घेतल्याचे समोर आले आहे. सोसायटीने तब्बल ३ हजार ६९६ कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले आहे. त्यातील ३ हजार ५५४ कोटी



रुपयांचे कर्ज एकट्या कुटे उद्योग समूहाच्या विविध उद्योगांसाठी वळविले आहे. कर्जदार अर्चना व सुरेश कुटे दोघेही कोठडीत आणि त्यांच्या मालमत्ताही 'एमपीआयडी'खाली जप्त असल्याने आता वसुली करायची कशी, ▶ उर्वरित पान २ वर

**● 'ज्ञानराधा'मधून सुरेश कुटेच्या उद्योग समूहालाच बहुतांश कर्ज असून त्याच्या मालमत्ता सक्तवसुली संचालनालय (ईडी), शासनाने जप्त केल्या आहेत. उर्वरित सुवर्ण व इतर कर्जाची वसुली केली जात आहे. १४६ सोने कर्जदारांकडून ७४ लाख रुपयांची वसुली केली आहे. – समृत जाधव, प्रशासक, ज्ञानराधा मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, बीड**

# बीडमधील 241 कोटींच्या भूसंपादन घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांच्या सह्यांची होणार तपासणी

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील २४१ कोटी ६२ रुपयांच्या भूसंपादन घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सही बनावट होती की नाही, याची तपासणी राज्य गुन्हा अन्वेषण विभागाकडून केली जाणार आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तीन आरोपीची दूरध्वनी संभाषणाचे विश्लेषण पूर्ण झाले आहे. या प्रकरणात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केलेल्या चौकशीतून ७३ कोटी रुपयांचा अपहार उघडकीस आला होता. या प्रकरणातील तपास बराच पुढे गेला असला तरी गुन्हा सिद्ध होण्यासाठी अनेक पुरावे गोळा करण्यावर अधिक लक्ष केंद्रीत असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान करण्यात आलेल्या सह्यांची हस्ताक्षर तज्ज्ञांकडून तपासणीही केली ▶ उर्वरित पान २ वर

# राज्यात भीक मागण्यास बंदी!

## विधानसभेपाठोपाठ विधान परिषदेतही विधेयक मंजूर

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यात आता लवकरच भीक मागण्यास बंदी घालण्यात येणार आहे. विधानसभेपाठोपाठ आता विधान परिषदेमध्येही महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध विधेयक मंजूर करण्यात आलं. परंतु सभागृहातील अनेक सदस्य असमाधानी असताना गोंधळाच्या स्थितीत हे विधेयक मंजूर करण्यात आलं. त्यामुळे तालिका सभापती नीलम गोऱ्हे, शिवसेनेच्या



आमदार मनिषा कायंदे, राष्ट्रवादीचे अमोल मिटकरा यांच्यासह अनेकांनी नाराजी व्यक्त केली. विधान परिषदेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर आता सभापतींच्या दालनात शनिवारी बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे.

राज्यात भीक मागण्यास प्रतिबंध घालणारे विधेयक हे गोंधळाच्या स्थितीत विधान परिषदेत मंजूर करण्यात आलं. राज्याच्या मंत्री अदिती तटकरेंनी हे विधेयक मांडलं. त्यावर आमदार मनीषा कायंदे, अमोल मिटकरी आणि तालिका सभापती निलम गोर्हे यांनी असमाधान व्यक्त केलं. महारोगी ▶ उर्वरित पान २ वर

# परळी नगरपालिका निवडणुकीतून एकूण पाच जणांची माघार

**परळी । प्रतिनिधी**

परळी नगर पालिकेच्या निवडणुकीत चार प्रभागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. सुधारित कार्यक्रमात तीन जणांनी माघार घेतली. परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यात नगरपरिषद निवडणूक मधील चार प्रभागातील जागांचा समावेश आहे. सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणुक आयोगाच्या परिपत्रकानुसार आक्षेप आलेल्या जागांपैकी प्रभाग क्रमांक ३ मधील दोन्ही जागासह प्रभाग क्रमांक ९ अ, प्रभाग क्रमांक ते १४ ब या जागेवरची निवडणूक २० डिसेंबर रोजी होणार आहे. दरम्यान एकूण ५ माघार जाणांनी माघार घेतली आहे. कल्याणी रामदास (शिवसेना), प्रभाग १४ ब-पूजा अभिजीत शेंद्रे (अपक्ष) यांनी सुरुवातीला माघार घेतली. सुलतानाबी नजीर (अपक्ष), प्रभाग ३ अ कुरेशी मुस्तकिम रियाज कसाब (अपक्ष), प्रभाग ३ ब शेख यासमीन अजीम, (अपक्ष) यांनी माघार घेतली. नगरपरिषदच्या निवडणुकीसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम अनुसार ४ जागेसाठी १९ आता रिंगणात आहेत.

# गारेगार! महाराष्ट्रात पुढचे ४८ तास थंडीच्या लाटेचे; कोणत्या भागांमध्ये पडणार हाडं गोठवणारा गारठा?



**मुंबई । प्रतिनिधी**

हिमालयावरून येणाऱ्या शीतलहरींचा थेट परिणाम मध्य भारतासह आता महाराष्ट्रावरही दिसत असून, राज्याच्या बहुतांश भागांमध्ये तापमानाच लक्षणीय घट नोंदवण्यात आली आहे. निफाड, धुळ्यासह नागपूर, जालना या भागांमध्ये किमान तापमान एकेरी आकड्यावर आल्यानं थंडीचा कडाका नागरिकांना घरात डांबून ठेवण्यास जबाबदार ठरत आहे. केंद्रीय हवामानशास्त्र विभाग आणि ▶ उर्वरित पान २ वर






# रक्तदान करणारे स्वर्गीय मुंडे साहेबांच्या रक्ताच्या नात्याचे : डॉ.प्रितमताई मुंडे

**● वडवणीत भव्य रक्तदान शिबिरात १५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान**


**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी मध्ये गेल्या पंधरा वर्षापासून स्वर्गीय मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर हे युवा नेते संजय आंधळे घेत असून हा उपक्रम म्हणजे स्वर्गीय मुंडे



साहेब यांना एक प्रकारे आदरांजली असून या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान करणारे रक्तदाते हे स्वर्गीय मुंडे साहेबांच्या रक्ताच्या नात्यातील आहेत असे आम्ही मानतो असे वडवणी येथे काल गुरुवार रोजी आयोजित करण्यात आलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

**● कार्यक्रमाचे संयोजक संजय भाऊ आंधळे यांनी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या भव्य रक्तदान शिबिरामध्ये रेकॉर्ड ब्रेक तब्बल १५१ रक्तदात्यांनी रक्तदान करून उच्चार केला असून या भव्य शिबिराचे कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन नियोजन संजयभाऊ आंधळे यांनी केल्याने त्यांचे माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी कौतुक केले तसेच बीड जिल्ह्यात वडवणी येथे हा भव्य रक्तदान शिबिराचा कार्यक्रम भव्य दिव्य पार पाडला.**

# लोकसह्याद्रीचा महामेरू: वटवृक्ष शरदचंद्रजी पवार



महाराष्ट्राच्या मातीला आणि देशाला आपल्या कर्तृत्वाने दिशा देणारे नेतृत्व, संकटांच्या छाताडावर पाय देऊन विजयाचे शिखर गाठणारा जिद्दी योद्धा आणि भारतीय राजकारणातील 'चाणक्य' म्हणून ओळखले जाणारे पद्मविभूषण डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब यांचा आज वाढदिवस.

● राजकारणातील हिमालय आणि सह्याद्रीचा संगम

देशाच्या राजकारणात जेव्हा जेव्हा महाराष्ट्राचा उल्लेख होतो, तेव्हा पवार साहेबांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. दिल्लीच्या तख्तासमोर कधीही न झुकणारा हा 'सह्याद्री' देशाच्या राजकारणात 'हिमालय' होऊन उभा ठाकला आहे. शेतीपासून संरक्षण खात्यापर्यंत आणि खेळाच्या मैदानापासून ते साहित्याच्या दरबारापर्यंत साहेबांचा व्यासंग दांडगा आहे.

● पराभवालाही नमवणारी जिद्द

जेव्हा सर्व काही संपले असे वाटते, तेव्हा साहेबांचा संघर्ष नवा मार्ग दाखवतो. हे विधान केवळ स्तुती नाही, तर सत्य आहे. वयाची ऐंशी पार केल्यानंतरही पावसात भिजत सभा घेणारा तो योद्धा जगाने पाहिला आहे. साहेबांकडून मिळणारी सर्वात मोठी शिकवण म्हणजे– संकट कितीही मोठे असले तरी धीर सोडू नये आणि शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहावे. हीच सकारात्मक ऊर्जा आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणास्त्रोत आहे.

● पुरोगामी विचारांचे वारसदार

शरद पवार हे केवळ एक नाव नसून तो एक विचार आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे ते खऱ्या अर्थाने वारसदार आहेत. जात–पात आणि धर्माच्या पलीकडे जाऊन 'माणूस' केंद्रबिंदू मानून त्यांनी समाजकारण केले.

● कर्तृत्वाचा आलेख

● कृषी क्रांती: देशाच्या कृषी खात्याला नवी दिशा देऊन अन्नधान्याच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण केले.

● महिला सक्षमीकरण: देशात सर्वप्रथम महिलांना सैन्यात आणि स्थानिक स्वराज्य संस्थेत आरक्षण मिळवून देण्याचे ऐतिहासिक पाऊल उचलले.

आपत्ती व्यवस्थापन: लातूरचा भूकंप असो वा मुंबईचा बॉम्बस्फोट, संकटाच्या काळात पाय रोवून उभा राहणारा हा नेता प्रशासनासाठी आजही आदर्श आहे.

● एक कृतज्ञता...

साहेब, तुमचे आयुष्य ही आम्हा सर्वांसाठी एक प्रयोगशाळा आहे. प्रत्येक संघर्षातून नवे काहीतरी शिकण्याची उमेद तुम्ही आम्हाला दिलीत. महाराष्ट्राच्या मातीतील सामान्य कार्यकर्त्यालाही स्वतः च्या ताकदीची जाणीव करून देणारे तुमचे नेतृत्व सदैव वटवृक्षाप्रमाणे आमच्यावर सावली धरून राहो. साहेब आपणास उदंड व निरोगी दीर्घायुष्य लाभो हीच पंढरीच्या पांडुरंग चरणी नम्र प्रार्थना!

– अशोक सुखवसे, बीड

संपर्क: ९८५०१९९५५५

◆ पान १ वरून पुढे...

## गोदाकाठावरील ३२....

प्रमाणावर विसर्ग झाल्याने संबंधित गावांत पुन्हा एकदा पुर परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे नागरीकांमध्ये प्रचंड भितीचे वातावरण पसरले होते. अशावेळी आम्ही त्यांना धिर दिला, अशा या गंभीर परिस्थितीत प्रशासनाकडून वेळेवर सक्षम उपाययोजना करणे आवश्यक असून त्याअनुषंगाने जिवीत व वित्तहानी टाळण्यासाठी गेवराई तालुक्यातील ३२ गावांचे पुर्नवसन करण्याची मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी केली.

## अभिलेखे कक्षाचे...

'काळे' कारनाम्यांना जबाबदार कोण? अभिलेखे कक्षात यापूर्वीही पैशांसाठी अनेकदा लोकांची अडवणूक झाल्याचे आरोप आहेत. या विभागात एवढे 'काळे' कारनामे सुरू असतानाही आणि कामगारासारखा व्यक्ती लाचखोरीतून 'चंद्रा'वर पोहोचलेला असताना, त्याकडे कोणी दुर्लक्ष केले, असा सवाल उपस्थित होत आहे. आता या लाचेच्या कारवाईत आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास एसीबीकडून केला जाणार असून, विभागप्रमुखांसह सत्यप्रतवर सह्या करणारे अधिकारीही अडचणीत आले आहेत. अविनाश धांडे आत्महत्येचे प्रकरण शांत– याच पालिकेतील वसुली विभागातील कर्मचारी अविनाश धांडे यांनी आत्महत्या केल्यानंतर, मृत्यूपूर्वी त्यांनी आरोप केलेल्या व्यक्तींची अद्यापही पोलिसांनी चौकशी केलेली नाही. या आरोपींना 'लाख'मोलाचे सहकार्य करण्यासाठी काही राजकीय व्यक्ती धावपळ करत असल्याची सूत्रांची माहिती आहे. बीड शहर पोलीस मात्र या प्रकरणावर मौन बाळगून आहेत.

## ज्ञानराधा क्रेडिट...

असा पेच 'ज्ञानराधा'च्या प्रशासकाला पडला आहे.

'ज्ञानराधा सोसायटी'तर्फे ठेवीदारांच्या फसवणुकीनंतर केंद्रीय सहकार विभागाने तत्कालीन जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांची प्रशासक म्हणून नेमणूक केली. प्रशासक नेमून वर्षाचा कालावधी उलटल्यानंतर ठेवीदारांच्या हाती काय, असा प्रश्न कायम आहे. या पार्श्वभूमीवर समोर आलेले वास्तव भयानकच आहे. प्रशासकांचे मूळ काम कर्जाची वसुली करून ठेवीदारांना रक्कम देणे आहे. मात्र, आता कर्जवसुली करायची कुणाकडून, असा प्रश्न आहे.

सुरेश कुटे हा मूळ उद्योजक होता. कापड दुकानदार सुरेश कुटेने २० वर्षांपूर्वी ज्ञानराधा अर्बनची शाखा काढली. 'ज्ञानराधा'चा विस्तार करत असतानाच त्याने कुटे उद्योग समूहही वाढविला. 'ज्ञानराधा'च्या बीडसह जालना, परभणी, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, मुंबई आदी ठिकाणी ५२ तर इंदूर (मध्य प्रदेश) येथे एक शाखा आहे. दोन वर्षांपासून सर्व शाखांना टाळे लागले असून ठेवी परत मिळविण्यासाठी सामान्य ठेवीदारांचा आक्रोश कायम आहे. या प्रकरणात एकट्या बीडमध्ये ६५ तर अन्य ठिकाणी असे एकूण ८७ गुन्हे नोंद आहेत. यातील ६९ गुन्हे आता राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग झाले आहेत.

एकाच शाखेत वळविल्या ठेवी– राज्यभरात ५२ शाखा असलेल्या 'ज्ञानराधा'त ठेवीदारांनी पैसे ठेवताच तो बीडच्या जालना मार्गावरील शाखेत वळविला जाई. तेथूनच तो स्वत:च्या व्यवसायांना कर्ज घेत असे. त्याची ८८ पैकी बहुतांश कर्ज प्रकरणे एकाच शाखेतील आहेत.

ठेवी येताच घेई स्वत:च्याच उद्योगांसाठी कर्ज– 'ज्ञानराधा'च्या विविध शाखांमध्ये ३७६२५६ खातेदार व ठेवीदारांच्या सुमारे २९५९ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. तुलनेत 'ज्ञानराधा'कडून कर्जवाटपाचा आकडा अगदीच नगण्य आहे. ६५५२ कर्जदारांना ३६९६ कोटी रुपये कर्ज दिले आहे. त्यात एकट्या सुरेश कुटेने स्वत: व पत्नीच्या कुटे समूहाच्या विविध उद्योगांना ८८ कर्जप्रकरणांतून तब्बल ३५४५ कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. उर्वरित ६४६४ कर्जदारांकडे केवळ १५१ कोटी ८० लाख रुपयांचे कर्ज आहे. यातील एक ५० कोटींचा कर्जदारही कुटेशी संबंधित आहे.

## बीडमधील 241....

जाणार आहे. या गैरप्रकारात परळी येथील सहाय्यक महसूल अधिकारी संजय हांगे संगणक परिचालक अविनाश चडखण , शेख अजहर शेख बाबू व बीड येथील सेवानिवृत्त कर्मचारी विनोद पिंगळे, सहाय्यक महसूल अधिकारी पांडुरंग पाटील , ॲड. एस. एम. ननवरे, ॲड. नरवडकर, ॲड. पिसुरे, ॲड. प्रवीण राऊत आदीचा सहभाग असू शकतो,असे प्राथमिक चौकशीतून स्पष्ट झाले होते. बनावट आदेश तयार करण्याच्या गैरप्रकारात प्रमुख अधिकारी – कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर घोटाळा समोर आला होता. जुन्या तारखांचे ४० लवाद आदेश आढळून आले होते. तत्कालीन जिल्हाधिकरी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी करून दि. १ मार्च २०२५ ते १७ एप्रिल २०२५ पर्यंतच्या १५४ बनावट आदेश निर्गमित करण्यात आले होते. यातील सर्व कागदपत्रे आणि संचिका पोलिसांनी ताब्यात घेतल्या असून या प्रकरणाचा खरा सूत्रधार कोण, हे तपासण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. या प्रकरणात घडलेल्या गुन्ह्याचा तपास केल्यानंतर तो कागदोपत्री सिद्ध करण्यासाठी आवश्यक ते पुरावे गोळा केले जात असल्याचे सांगण्यात आले. बनावट सह्या, दूरध्वनीवरील संभाषणासह सर्व पुरावे गोळा करुन कारवाईची दिशा ठरवली जाईल असे पोलिसांनी सांगितले.

## राज्यात भीक...

शब्द वगळण्यासाठी आलेल्या विधेयकाचा आणि त्याचे शीर्षक यात ताळमेळ नसल्याची प्रतिक्रिया आमदार एकनाथ खडसेंनी दिली. तर, विधेयकाबाबत माहिती दिलेल्या पुस्तिकेतील स्पष्टीकरणावर तालिका सभापती नीलम गोऱ्हेंनी असमाधान व्ये केले.

## गारेगार! महाराष्ट्रात...

महाराष्ट्रातील हवामान निरीक्षण यंत्रणांच्या माहितीनुसार पुढील ४८ तास राज्यात थंडीचा कडाका वाढणार असून मध्य महाराष्ट्रासह विदर्भ आणि मराठवाड्यासाठी किमान तापमानाचा अर्थात हाडं गोठवणाऱ्या थंडीचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर, कोकणासह पश्चिम महाराष्ट्रातही पारा घसरणार असल्यामुळं गारठा या भागांमध्येसुद्धा जाणवेल असा अंदाज आहे.

राज्याच्या कोणत्या भागांमध्ये गारठा वाढणार? धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर, गोंदिया, नागपूर इथं थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तर राज्यातील घाट क्षेत्रातही घोंगावणाऱ्या शीतलहरी अडचणी निर्माण करताना दिसतील. या भागावर धुक्याचं साम्राज्य असून दृश्यमानतेवर त्याचा परिणाम होणार असल्यानं वाहतुकीदरम्यान सतर्कता बाळगण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी राज्यात थंडीचा जोर कमी झाला होता. मात्र पुन्हा एकदा उत्तरेकडे शीतलहरी अधिक तीव्र झाल्यामुळं आणि नव्यानं पश्चिमी झंझावात सक्रिय होत असल्यामुळं वारे महाराष्ट्रापर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळं राज्याच्या बहुतांश भागांमध्ये थंडीचा कडाका वाढला असल्याचं स्पष्ट होत आहे. फक्त मराठवाडा, विदर्भच नव्हे, तर मुंबई शहर आणि उपनगरांसह ठाणे, रायगड, पालघरमध्येसुद्धा किमान तापमानात घट नोंदवण्यात येत आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रानुसार शहरातील रात्रीच्या तापमानाचा आकडा १७ ते २० अंशांदरम्यान असून दुपारी ११ ते १२ पर्यंत हवेत हा हलका गारठा टिकून राहत आहे. पुन्हा दिवस मावळतीला गेल्यानंतर थंड वाऱ्यांचे झोत शहरात वाहत असल्यानं कधी नव्हे ते मुंबईकरही या गुलाबी थंडीनं गारठत आहेत.

## रक्तदान करणारे...

भव्य रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाच्या वेळी उद्घाटक म्हणून बोलताना बीड जिल्ह्याच्या नेत्या माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी विचार व्यक्त केले. वडवणी शहरातील भारतीय जनता पार्टी कार्यालय अण्णाभाऊ साठे चौक येथे भाजपा मोर्चा युवा मोर्चा बीड जिल्हा अध्यक्ष संजय भाऊ आंधळे व स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे प्रतिष्ठान यांच्या वतीने काल गुरुवार रोजी स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते यावेळी या रक्तदान शिबिराचे उद्घाटक म्हणून दबंग माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चौसाळा मतदार संघाचे माजी आमदार केशवराव आंधळे हे होते तसेच यावेळी भाजपा नेते माधवतात्या निर्मळ,भाजपा तालुका अध्यक्ष सुखदेव दादा रेडे,उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी सभापती दिनकरभाऊ आंधळे,बाजार समिती उपसभापती अनिलदादा चोले, मच्छिंद्रबप्पा झाटे, विश्वनाथदादा झाटे,महादेवबप्पा रेडे,अंकुशतात्या वारे,पांडूरग अंडील, नारायण शेळके, रोहिदास खोटे, अशोक गोंडे, शिवाजी आप्पा मुंडे,मनोज पाटील, विक्रांत हजारे,यासह इतर असंख्य मान्यवर उपस्थित होते यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक या कार्यक्रमाचे संयोजक संजय भाऊ आंधळे यांनी केले तसेच यावेळी महादेव तात्या निर्मळ,माजी आमदार केशवराव आंधळे यांनीही मनोगत व्यक्त केले तसेच यावेळी बोलताना माजी खासदार डॉक्टर प्रितमताई मुंडे म्हणाले बीड जिल्ह्यामध्ये बीड जिल्हा वासियांचे गेल्या पन्नास वर्षापासून चे रेल्वेचे स्वप्न पूर्ण होत असून यामध्ये बीड जिल्ह्यातील रेल्वे संघर्ष समिती असतील सामाजिक कार्यकर्ते असतील यांनी रेल्वे आणण्यासाठी संघर्ष केला आंदोलन केली परंतु त्याला गती मिळण्यासाठी राजकीय पाठबळ देण्याचे काम स्वर्गीय मुंडे साहेबांनी त्याकाळी दिले त्यावेळी विरोधी पक्ष नेते असताना व तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख असताना राज्य सरकारने ५० टक्के खर्च उचलण्याचे काम मुंडे साहेबांच्या प्रयत्नामुळे झाली व त्या रेल्वेचे कामाला खरी गती त्यावेळेस पासून मिळाली व या रेल्वेच्या प्रश्नासाठी मीही दहा वर्षे खासदार असताना पाठपुरावा केला परंतु कधीही याचे श्रेय घेण्याचा मी कधीही प्रयत्न केला नाही तसेच स्वर्गीय मुंडे साहेबांच्या वाढदिवसानिमित्त व जयंतीनिमित्त संजय आंधळे हे गेल्या पंधरा वर्षापासून रक्तदान शिबिर कार्यक्रम आयोजित करतात तरी या रक्तदानाच्या कार्यक्रमातून गरजू रक्तदात्यांना रक्त मिळते व त्यामुळे एका रक्तदानामुळे पाच जणांचा जीव वाचतो तरी संजय आंधळे यांना या अगोदर कोणतेही पद नव्हते परंतु आता भाजपा युवा मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष पद मिळालेले आहे त्यामुळे त्यांनी दरवर्षीपेक्षा यावर्षी भव्य रक्तदान शिबिराचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे तरी यापुढे यापेक्षाही मोठा कार्यक्रम त्यांनी आयोजित करावाअसे त्या म्हणाले. तरी वडवणी येथील स्वर्गीय मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या भव्य रक्तदान शिबिराचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय भाऊ आंधळे मित्र मंडळ व स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब प्रतिष्ठान सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले यावेळी या या कार्यक्रमाला वडवणी तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे नेते,कार्यकर्ते,सरपंच,उपसरपंच,चेअरमन,सदस्य, शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबासो आंधळे यांनी तर आभार प्रदर्शन ईश्वर तांबडे यांनी केले.

◆ पान ४ वरून पुढे...

## लोकांच्या प्रश्नांसाठी...

उमेदवार अमर नाईकवाडे यांना जाहीर पाठींबा दिला आहे. या संदर्भात करण लोंढे यांनी म्हटले आहे की, आज मी माझ्या सर्व सहकार्यांनी विचारात घेऊन अमर नाईकवाडेंना पाठींबा देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रभाग क्र.३ मधील आजची राजकीय परिस्थिती पाहता कुठेतरी एका सर्व सामान्य कुटूंबातून पुढे आलेल्या लढाऊ नेतृत्वाला राजकारणातून संपवण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचे वाटू लागले आहे. ज्या नेतृत्वाच्या माध्यमातून आपल्या प्रभागाचा प्रबळ विकास झालेला आहे. ज्याने घराणेशाही आणि झुंडशाहीला तोंड देत नगर पालिकेच्या सभागृहात प्रभागातील विकास कामांसाठी आवाज उठवलेला आहे, भांडूण विकास कामे आणलेली आहेत. स्वत:च्या जिवाची पर्वा न करता निर्भिडपणे आपल्या प्रभागाच्या प्रश्नासाठी आणि येथील नागरीकांसाठी लढणार्या अमर नाईकवाडे यांना साथ देण्याची हीच वेळ आहे. त्यामुळे सर्व मतदार बंधु–भगिनी आणि मातांनी आपलं एक मौल्यवान मत घड्याळीला म्हणजेच अमर नानांना देऊन त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन करण लोंढे यांनी केले आहे. दरम्यान करण लोंढे यांच्या पाठींब्याने काँग्रेसचे मजुबत हात अमरनानांच्या पाठीशी असल्याचे स्पष्ट झाले आहे. सर्व सामान्य जनतेनेही अमरनाना यांनाच पसंती देण्याचा निर्णय घेत अमर नानांसारख्या लढाऊ नेतृत्वाला बहुमताने नगर पालिकेच्या सभागृहात पाठवण्याचा निर्धार केला आहे.

## मराठवाड्यातील मदत...

प्रयत्न, खोटे गुन्हे दाखल करणे आणि चौकशांची मालिका झाल्याचा उल्लेखही त्यांनी केला. प्रत्येक चौकशीनंतर सत्य बाहेर आले आहे. आमच्यावरचा एकही आरोप सिद्ध झालेला नाही, असे धस यांनी सभागृहात ठामपणे सांगितले. या ऐतिहासिक निर्णयासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि विद्यमान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराबद्दल त्यांनी मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. मदत मास–खिदमत मास जमिनींच्या मुक्ततेनंतर मराठवाड्यातील नागरिकांवरील अनेक वर्षांचे बंधन दूर होऊन विकासाचा मार्ग अधिक वेगाने खुला होईल असा विश्वास आमदार धस यांनी व्यक्त केला.

## बीड जिल्ह्याचे ...

टंचाई निर्माण झाली, अशावेळी त्यांनी काही धाडसी निर्णय घेऊन मोठमोठे प्रकल्प उभी केली. त्यामुळे राज्याच्या औद्योगिक विकास झाला. उपक्रम,निर्णय जे की, स्व. मुंडे साहेबांनी हाती घेतले. त्यामुळे राज्य सरकारने १२ डिसेंबर रोजी सर्व शासकीय कार्यालय,महामंडळे, अंगीकृत उपक्रम या ठिकाणी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांची जयंती साजरी करण्यात यावी.अशी मागणी बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे भाजपा बीड जिल्ह्याचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील मा. नं. प. सभापती तथा लोकशाही पत्रकार संघांचे प्रदेश उपाध्यक्ष यांनी केली आहे.

## पिंपळनेर परिसरात...

चांगली वाढ होण्यासाठी खताची मात्रा देखील दिली जात आहे. हिवाळ्यामध्ये हे पीक साडेतीन ते साडेचार महिन्यांत येते. सध्या थंडी मोठ्या प्रमाणात असून, हे वातावरण गव्हाला पोषक आहे. गव्हाच्या वाढीला या थंड वातावरणाचा चांगला फायदा होण्यास मदत होत आहे. मात्र लहरी हवामानाचा या पिकावर परिणाम होताना दिसत आहे. गहू पिकावर तांबेला व काळा मावा पडण्याची भीती असल्याचे पिंपळनेर येथील शेतकरी ,बळीराम म्हेत्रे यांनी व्यक्त केली.

## लाडेगाव, दीपेवडगाव....

स्वतंत्र करुन वीज पुरवठा करण्यात यावा, होळ सब स्टेशन ला ५चण– +१० चण– क्षमतेचे रोहित्र तात्काळ बसवण्यात यावे आदी.प्रमुख मागण्यांसाठी गुरुवारी दि.११ डिसेंबर रोजी होळ३३/११के.व्ही. विद्युत उपकेंद्रावर क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या नेतृत्वाखाली सकाळी ११ वाजल्यापासून दुपारी २वाजेपर्यंत धरणे आंदोलन करण्यात आले. धारूर वीज वितरण उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. गोकुळ मोरे ,कनिष्ट अभियंता अभिजित पाटिल यांनी आंदोलकांच्या रास्त मागण्या मान्य करून पुढील तीन दिवसात वीज पुरवठा पूर्ण क्षमतेने देण्याचे लेखी आश्वासन दिल्याने आंदोलन तूर्त स्थगित करण्यात आले.आंदोलनात बालाजी गुळभीले, ऍड. राजेश शिंदे,योगेश्वर अंबाड, दीपक अंबाड,हरिभाऊ आघाव ,प्रमोद पांचाळ,राजाभाऊ सोमवंशी ,संतोष शिंदे ,सुशांत अंबाड,अंगद अंबाड ,सह लाडेगाव, दिपेवडगाव, लाडेवडगाव,मुलेगाव ,होळ येथील शेकडो शेतकरी उपस्थित होते. आंदोलन स्थळी युसूफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. भाजपा चे श्री. नेताजी शिंदे ,राष्ट्रवादी काँग्रेस (शरद चंद्र पवार )पक्षाचे संभाजी लोमटे यांनी शेतकरी आंदोलनात सहभागी होऊन पाठिंबा दिला.

## तलवाडा येथील...

पि. टि. आर नसल्याने शासनाच्या घरकुल योजनेसह विविध योजनेचा लाभ येथील रहदारीत आसलेल्या नागरिकांना मिळत नसल्याची बाब नागरिकांनी तलवाडा येथील अमरसिंह पंडित समर्थक शेख लालाभाई यांच्या लक्षात आणुन दिल्याने या बाबीवर शेख लालाभाई यांनी सातत्याने पाठपुरावा करत ही बाब प्रशासनिक स्तरावर कार्यनिर्वीत व्हावी म्हणून ही बाब राष्ट्रवादी कांग्रेस पार्टीचे सचिव माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या ध्यानस्थ आणुन दिली. माजी आ.अमरसिंह पंडित यांनी लागलीच वरिल रहदारीत आसलेल्या नागरिक व संबंधित प्रशासनाची समन्वय बैठक घडून आणत शासनाच्या जी आर नुसार यावर ग्रामपंचायत स्तरावर प्रशासनिय प्रक्रिया पूर्ण करून भूमि अभिलेख कार्यलयाला पि. टि. आर साठी संबंधित आतिक्रमण धारकांचे भोगवटा क्रमांक सहित आर्ज सादर करावेत आस्या सुचना तलवाडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी श्री सोपान मुसळे यांना दिल्या असुन अंबिकानगर, गणेश नगर व ईदगाह नगर येथील नागरिकांच्या अपेक्षा पलवीत झाल्या असुन लालाभाई यांचे नागरिक आभार व्यक्त करत आहे.

## बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांचा...

व कर्मचारी यांनी मे २०२५ पर्यंत १००% उद्दिष्ट पूर्ण केले तसेच ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत एकूण रुपये १,३२,३०,०००/– (एक कोटी बत्तीस लाख तीस हजार) इतका निधी गोळा करून ३३५% संकलनासह राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. या भव्य संकलनात जिल्हा परिषद, पोलीस विभाग, महसूल प्रशासन, शासकीय रुग्णालये, तसेच राज्य परिवहन महामंडळ यांनी केलेले योगदान विशेष उल्लेखनीय आहे. राज्यातील सर्वोच्च संकलनाबद्दल आचार्य देवव्रत, राज्यपाल महाराष्ट्र व गुजरात यांच्या वतीने दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी मुंबईतील लोकभवन येथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा विशेष सत्कार करण्यात आला. माजी सैनिकांच्या कल्याणासाठी ही कामगिरी अत्यंत अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन करीत मा. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्वांचे कौतुक केले. ध्वजदिन निधी संकलनाची जबाबदारी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय पार पाडते. या वेळी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लीडर विद्यासागर कोरडे (नि.) यांनीही बीड जिल्ह्यातील जनतेचे व अधिकारी–कर्मचाऱ्यांचे आभार मानत, पुढील वर्षीही याच उत्साहाने अधिक मोठे योगदान मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

## जयभवानी व...

महोत्सवाची माहिती देताना रणवीर पंडित पुढे म्हणाले की, गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात करीअर करता यावे यासाठी आणि त्यांना आपल्या हक्काचे मैदान मिळावे व त्यांच्या क्रीडागुणांना वाव मिळावा यासाठी गेल्या तीन वर्षांपासून या क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. संस्थेच्या विविध शाळेत या स्पर्धा होणार आहेत. शनिवार, दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी गेवराई येथील नगर परिषदेच्या जलतरण तलावात मुले आणि मुलींच्या गटात जलतरण स्पर्धा होणार आहेत. रविवार, दि.२८ डिसेंबर २०२५ रोजी शारदा कॅडमीच्या मैदानावर मुलींच्या गटात कबड्डी स्पर्धा तर शारदा विद्यामंदिर, गेवराई येथे मुले आणि मुलींच्या गटात बुध्दिबळ स्पर्धा होणार आहेत. सोमवार, दि.२९ डिसेंबर रोजी शारदा कॅडमीच्या मैदानावर मुलांच्या गटात कबड्डी स्पर्धा होणार आहेत. मंगळवार, दि.३० डिसेंबर रोजी शिवाजी विद्यालय, मालेगाव येथे मुले आणि मुलींच्या गटात व्हॉलीबॉल स्पर्धा होणार असून बुधवार, दि.३१ डिसेंबर रोजी माध्यमिक विद्यालय, पाचेगाव येथे मुलींच्या गटात खो–खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३१ डिसेंबर रोजीच जय भवानी विद्यालय, शिवाजीनगर येथे मुले आणि मुलांच्या गटात बॅडमिंटन स्पर्धा होणार आहेत. गुरुवार, दि.१ जानेवारी २०२६ रोजी माध्यमिक विद्यालय, पाचेगाव येथे मुलांच्या गटात खो–खो स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि.२ जानेवारी रोजी मुलींच्या गटात तर शनिवार, दि.३ जानेवारी २०२६ रोजी मुलांच्या गटात शिवशारदा पब्लिक स्कुलच्या भव्य मैदानावर थलेटिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि.४ जानेवारी रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शिवशारदा पब्लिक स्कुलच्या मैदानावर थलेटिक स्पर्धेचे अंतिम सामने होणार असून यावेळी विजेत्यांना पारितोषिकांचे वाटप करण्यात येणार असल्याचेही रणवीर पंडित यांनी सांगितले. क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व क्रीडा शिक्षक परिश्रम घेत असून आज युवा नेते पृथ्वीराज पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या अठराशे विद्यार्थी खेळाडूंना शारदा स्पोर्टस् कॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते मोफत कीटचे प्रातिनिधीक स्वरुपात वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे सहप्रशासन अधिकारी प्रा.गोगुले, प्राचार्य व्ही.पी. राठोड, संतोषकुमार आन्नम, सय्यद युनूस, भक्तराज पौळ, अशोक तौर, रणजित सानप, उदय पाठक, शिवाजी पाटोळे, दत्तात्रय देशपांडे, भागवत राऊत, प्रकाश घाडगे, मुरलीधर पवार, अंकूश राठोड, सतिष गरड, अरुण हाटकर, सदाशिव गंगाधर, लक्ष्मण काळे, भागवत राऊत यांच्यासह सर्व क्रीडा शिक्षक, विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषद...

लढवत शहरात सर्वत्र डोअर टू डोअर प्रचार करत बजगुडे पाटील यांनी बीड शहर पिंजून काढले त्याच पद्धतीने आता येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकामध्ये आमच्याकडे सर्व जागेवर चांगली आणि ताकतीची उमेदवार असुन काँग्रेस तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद पंचायत समितीच्या जागा स्वबळावर लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले असुन त्याच अनुषंगाने रविवार दिनांक १४ रोजी दुपारी ०१ वाजता तालुका काँग्रेस कार्यालय, बीड याठिकाणी बैठक बोलावली असुन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूक लढण्यास इच्छुक उमेदवार, पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शेतकरी पुत्रांचा 'शेतकरी हक्क मोर्चा' 25 डिसेंबरला

## कापसाला १२ हजार व सोयाबीनला ७ हजार भाव देण्याची मागणी; सीसीआयची पिळवणूक थांबवा – शेतकऱ्यांची गर्जना



**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील कोरडवाहू शेतीचे प्रमुख आधारस्तंभ असलेले कापूस व सोयाबीन पिक अतिवृष्टी, अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात बाधित झाले आहे. उत्पादन खर्च वाढला, तर भाव मात्र कोसळले. शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतकऱ्यांच्या कापसाला आणि सोयाबीनला योग्य बाजारभाव न मिळाल्याने संताप व्यक्त होत असून शासनाने ठरवलेला हमीभाव जमिनीवरच्या वास्तवाशी विसंगत आहे, अशी टीका शेतकरी पुत्रांनी केली आहे. याच भूमिकेतून एक लढा मातीसाठी या ब्रीदवाक्याखाली बीड जिल्ह्यातील युवा शेतकरी पुत्रांनी एकत्र येत शेतकरी हक्क मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी जिल्ह्यातील विविध ठिकाणी बैठका घेऊन शेतकरी जागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे.

२५ डिसेंबरला मोर्चा

गुरुवार, दि. २५ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. शेतात राबणाऱ्या कष्टकरी बापासाठी आणि त्याच्या हक्कांसाठी हा लढा उभारण्याचा निर्धार शेतकरी पुत्रांनी व्यक्त केला आहे.

मोर्चातील प्रमुख मागण्या

१. कापूस १२,००० रुपये व सोयाबीन ७,००० रुपये प्रतिक्विंटल हमीभाव तात्काळ जाहीर करावा.

२. सीसीआयची ऑनलाइन खरेदी प्रक्रिया सुरळीत व पारदर्शक करावी.

३. विदेशातून कापूस व सोयाबीन आयात बंद करावी.

४. शेतमालावर योग्य दर मिळावा यासाठी आवश्यक ती धोरणात्मक पावले उचलावीत.

नियोजन बैठकीस युवा शेतकरी राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे, प्राचार्य तांदळे सर, शेतकरी नेते अमर शेख, ॲड. गणेश मस्के, गणेश नाईकवाडे, नितीनराव जायभाये, अमोल पाठक, किसान अध्यक्ष एम. बी. साळे, ज्येष्ठ नेते डॉ. गणेश ढवळे, बालाघाट शेतकरी नेते बाळासाहेब मोरे, व्याख्याते बाळासाहेब मस्के, संगमेश्वर आंधळकर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू गायके, सुहास जायभाये, हनुमान कुटे, माऊली शिंदे, दत्त सुरवासे, बाजीराव ढाकणे, विक्रम शिंदे आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी, युवा शेतकरी आणि शेतकरी पुत्र उपस्थित होते.

# राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पोखरी (घाट)चा सोहम मुळीक चमकला

## अमरावती-मुंबईच्या मल्लांना पराभूत करीत 'कांस्य' पदकाची कमाई; घोड्यावरून भव्य मिरवणुकीने स्वागत

**लिंबागणेश । प्रतिनिधी**


सिंधुदुर्ग जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ यंदा ओरस येथे भव्य प्रमाणावर पार पडल्या. राज्यभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील छोट्याशा पोखरी (घाट) गावातील कुस्तीपटू सोहम जीवन मुळीक याने शानदार खेळ करून आपली वेगळी ओळख निर्माण केली. अमरावती-मुंबईच्या अनुभवी मल्लांवर विजय- १४ वर्षांखालील गटातील ४४ किलो वजनी गटात स्पर्धा अत्यंत चुरशीच्या झाल्या. राज्यातील पारंपरिक ताकदीची केंद्रे मानल्या जाणाऱ्या



अमरावती व मुंबई येथील अनुभवी मल्लांना रोखत सोहमने तांत्रिक, आक्रमक आणि सातत्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. प्रतिस्पर्ध्यांच्या डावपेचांवर अचूक उत्तर देत अखेर कांस्यपदकावर नाव कोरले. गावात जल्लोष-घोड्यावरून मिरवणुकीने स्वागत- पदक जिंकल्यानंतर सोहम आपल्या जन्मगावात परतताच पोखरी (घाट) गाव उत्साहाने फुलून गेला. ढोल-ताशे, लेझीम पथक, बॅण्ड आणि आतिषबाजीच्या गजरात घोड्यावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. जय सोहम, आमचा मल्ल विजयी होवो अशा गगनभेदी घोषणा देत गावकऱ्यांनी सोहमवर पुष्पवृष्टी केली. गावातील सर्वच वयोगटातील नागरिक या अभिमानाच्या क्षणाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आज कऱ्हेवडगाव मध्ये दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची जयंती होणार उत्साहात साजरी

**आष्टी । प्रतिनिधी**



भाजप नेते दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची १२ डिसेंबर रोजी जयंती असून जयंतीनिमित्त परळीतील गोपीनाथ गडावर विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येत राज्यभर देखील ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते याच पार्श्वभूमीवर लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब प्रतिष्ठान कऱ्हेवडगांव ग्रामस्थांच्या वतीने तयारी पूर्ण झाली झाली असून कऱ्हेवडगांव नगरी जयंतीनिमित्त सज्ज झाली आहे. स्व गोपीनाथ मुंडे यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी १२ डिसेंबर रोजी प्रतिमेचे पूजन, भव्य रक्तदान शिबीर, किर्तन, महाप्रसाद, भव्य मिरवणूक सोहळा यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथे १२ डिसेंबर रोजी लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या जयंतीनिमित्त सकाळी ९ वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे प्रतिमेचे पूजन होऊन ९ ते १ यावेळेत भव्य रक्तदान शिबिर, ह.भ.प. आजिनाथ महाराज लाड यांचे सकाळी १० ते १२ यावेळेत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकणारे किर्तन होणार असून दुपारी १ नंतर महाप्रसाद व सायंकाळी ६ ते १० भव्य मिरवणूक सोहळा पार पडणार असून परिसरातील नागरिकांनी व मुंडे प्रेमींनी रक्तदान करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब प्रतिष्ठान कऱ्हेवडगांव व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संभाजी नगर येथे पार पडला विश्वविक्रम कृषीपंप प्रमाणपत्र प्रधान सोहळा

**तलवाडा । प्रतिनिधी**

भारत सरकार महावितरण ऊर्जा विभाग महाराष्ट्राचा विश्वविक्रम एका महिन्यात ४५,९११ सौर कृषिपंप लावण्याचा जागतिक उच्चांक गिनीज बुकमध्ये यशस्वी नोंद मागेल त्याला सौर कृषिपंप योजना विश्वविक्रमाचे प्रमाणपत्र प्रदान सोहळा शुभहस्ते देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री प्रमुख उपस्थिती एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार उपमुख्यमंत्री अतुल सावे मंत्री, अपारंपारिक ऊर्जा संजय शिरसाट पालकमंत्री, छत्रपती संभाजीनगर मेघना साकोरे-बोडर्डीकर राज्यमंत्री, ऊर्जा यांच्या उपस्थितीत शुक्रवार, दि.५ डिसेंबर २०२५, वेळ: सकाळी १० वाजता स्थळ : ऑरिक सिटी मैदान, शेंद्रा एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी पार



पडला यावेळी तलवाडा - तहत राजापुर येथील जेष्ठ महावितरण कर्मचारी काळे साहेब, लखन काळे, बंडु काळे यांना सन्मान पत्र देऊन गौरवान्वित करण्यात आले. यावेळी आभा शुक्ला (भा.प्र.से.) अपर मुख्य सचिव (ऊर्जा) लोकेश चंद्र (भा.प्र.से.) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांची उपस्थिति होती.

# 'उंच माझा झोका' या नाटकाचे उत्कृष्ट सादरीकरण; अभिनय, दिग्दर्शन आणि तंत्राचा उत्कृष्ट संगम!

## डॉ उज्वला वनवे, प्रमोद रामदासी, दीपा शेळके यांच्या अभिनय कौशल्यास रसिकांची वाहवा

**बीड । प्रतिनिधी**

महिलांवर होणारे अत्याचार, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्वप्नांची होणारी गळचेपी आणि चौकटबद्ध आयुष्य जगण्यास भाग पाडली जाणारी स्त्री. या सामाजिक प्रश्नांना जोरदार चपराक मारणारी, स्त्री ही दासी किंवा लाचार नसून ती एक शक्ती आहे. हे ठामपणे अधोरेखित करणारी प्रभावी नाट्यकलाकृती उंच माझा झोका बीडच्या रंगभूमीवर साकारली. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालय आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धा अंतर्गत प्रगती सेवाभावी संस्था, पाडळी यांच्या वतीने शैलेश गोजमुंडे लिखित आणि लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शित उंच माझा झोका हे दोन अंकी नाटक दिनांक ९ डिसेंबर



२०२५ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे सादर झाले.

लक्ष्मीकांत दोडके यांनी नाटकाचे केलेले दिग्दर्शन एका कसलेल्या नाट्य कलाकाराचा अभ्यास आणि अनुभव सांगून गेला. बीडच्या रंगभूमीवर आपल्या संवेदनशील आणि ताकदीच्या अभिनयासाठी ओळखल्या जाणाऱ्या डॉ. सौ. उज्वला वणवे यांनी 'मधु' ही भूमिका विलक्षण परिणामकारकतेने रंगवली. प्रमोद रामदासी यांनी दुःशासन, मधुकर, सासरा आणि पुजारी अशा चार विविध भूमिका साकारत अभिनय कौशल्याचे अप्रतिम प्रदर्शन केले. नवोदित अभिनेत्री दीपा शेळके यांनी 'सुमी' ची भूमिका मनाला भिडेल अशा भावविश्वात सादर करत प्रेक्षकांची मनं जिंकली. नाटकाच्या कथानकाला बळ देणाऱ्या इतर भूमिकांमध्ये दिग्दर्शक लक्ष्मीकांत दोडके (सुमीचे आबा), प्रतिक कांबळे (सुमीचा नवरा), किरण राठोड (रुपसिंग), अक्षरा लोळगे (बायजा) यांनी उत्तम अभिनयाने रंगत वाढवली. लमाण म्हणून सई दोडके, निधी दोडके, काव्या मुंदडा, प्रांजल टाक, ज्ञानदा जोशी, मन्मथ वादवाणी, आर्या वावरे, पल्लवी उघडे या बालकलाकारांनी आपल्या भूमिकांनी प्रेक्षागृहात प्रसन्नता निर्माण केली.

नेपथ्य, प्रकाशयोजना आणि पार्श्वसंगीत यांच्या विलक्षण समन्वयामुळे नाटकाचा प्रत्येक प्रसंग प्रेक्षकांच्या मनात खोलवर ठसत राहिला. प्रकाशयोजना रोहित पुराणिक व अशोक घोलप, तर पार्श्वसंगीत अक्षय फुलझळके व पवन शिंदे यांनी अतिशय प्रभावीपणे साकारले. नृत्यदिग्दर्शन शिवकुमार सोनवणे, नेपथ्य गणेश अवंतकर व सुरज उफाडे, तर रंगभूषा व वेशभूषा आर्या दोडके यांनी सुसंगतपणे सांभाळले. रंगमंच सहाय्य देवा दहे यांनी केले. नाटक सुरू झाल्यापासून शेवटच्या दृश्यापर्यंत प्रेक्षकांसमोर स्त्रीची घुसमट, संघर्ष, विद्रूप वास्तव आणि अखेरीस तिच्या अंतः शक्तीचा उदय एवढ्या प्रभावीपणे रेखाटला गेला की प्रेक्षागृहातील शांततेतही मनाचा झोका मात्र उंचावत राहिला. या नाट्यप्रयोगाने स्पर्धेत सहभाग असला तरी कलाकार मात्र रंगमंचावरचा आनंद आणि अभिनयाची उपासना मनमुराद जगताना दिसले. बीडच्या रसिक प्रेक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने नाटकाला एक वेगळी उंची प्राप्त झाली. 'उंच माझा झोका' हा फक्त नाट्यप्रयोग नसून तो स्त्रीशक्तीचा, सामाजिक वास्तवाचा आणि मानवी विवेकाला दिलेला हलकासा धक्का होता जो प्रेक्षकांच्या मनात अजूनही झुलत राहील, असे मत उपस्थित रसिकांनी व्यक्त केले.

## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/02540/18/23

फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: .........

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक बाळूमामा देवस्थान खाडेवाडी तालुका माजलगाव डिस्ट्रीक्ट बीड

न्यासाचा पत्ता : खाडेवाडी, वांगी, खाडेवाडी, बीड, माजलगाव, खाडेवाडी

**अर्जदार:– गवळण दामोधर तिडके,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:- (१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | PATALAI GHANTA 1 | 1000.00 |
| 2 | PITALI SAMAI 1 | 1000.00 |

**(अ) जंगम मिळकत :– रोख रु. २०००/– मात्र, (अक्षरी रुपये दोन हजार मात्र फक्त)**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | KHADEWADI, WANGI | 291/14 | 100X43.50=4350 S.FT | 230500 | BALUMAMA MANDIR LAND | 230500.00 |
| 2 | KHADEWADI, WANGI | 291/14 | 4350 | 320500 | BALUMAMA MANDIR LAND | 320500.00 |

**(ब) स्थावर मिळकत: रोख रु. ५५१०००/– मात्र, (अक्षरी रुपये पाच लाख एक्कावन्न हजार मात्र फक्त)**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ११-१२-२०२५ रोजी दिली.

शिक्का

(स्वाक्षरीत)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड

## जाहीर प्रगटन

**धारुर येथिल श्री एन.एम वाली दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज ७८/२०२३

सुभाष वि मुद्रिकाबाई

वादप्रश्न नक्की करण्याकरीता गैरअर्जदारास समन्स

प्रति, प्रतीवादी :– ४. रूक्मीण प्र. अनुरथ सपाटे, वय ७० वर्षे धंदा घरकाम रा विटा ता. पाथरी जि. परभणी

ज्याअर्थी अर्जदार यांनी यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थि त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सकाळी ११–०० वाजता तुम्ही स्वत: किंवा ज्यास योग्यरीत्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देउ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात समन्स प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत उपस्थित राहुन लेखी कैफियत दाखल करणेसाठी या व्दारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद किंवा प्रतिवाद ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तूमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या किंवा प्रतिवादाच्या पुष्टर्थ, पुरावा म्हणुन तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनूपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल,

आणखी. अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दुखिल करण्यांत तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक १०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर धारूर, जि. बीड

## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी तथा धर्मादाय उप–आयुक्त कार्यालय, बीड.**

प्रेमपद्म (नहार) बिल्डींग, औटी मंगल कार्यालयाजवळ, एस.बी.आय. समोर, जालना रोड, बीड– ४३११२२.

संख्या नोंदणी प्रकरण क्र. ५७३/२५

नियोजीत न्यासाचे नांव:– वेट्न्स क्रिकेट असोसिएशन फॉर महाराष्ट्र, मु. पो. राज हॉटेल बस स्टँड जवळ, बीड ता. जि. बीड

अर्जदार :– श्री किशोर माणीकराव जगताप–उपाध्यक्ष

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक संस्था, निबंधक, बीड विभाग बीड हे वर नमुद केलेल्या अर्ज यांसबंधी संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये चौकशी करणार आहेत. वर नमुद केलेली संस्था अस्तीत्वात आहे काय? आणी सदरची संस्था सार्वजनिक स्वरुपाची आहे काय? सदर संस्थेच्या नावाबाबत कोणाची हरकत आहे काय?

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारेखेपासून ३० (तीस) दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने स्वत: हजर राहुन किंवा विधीज्ञामार्फत पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मा. सहाय्यक संस्था निबंधक, बीड यांचे शीक्यानिशी आज दिनांक ०९.१२.२०२५ रोजी दिली.

शिक्का

(स्वाक्षरीत)
अधीक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
बीड विभाग बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :– १८१२/२०२५

अर्जदार :– १. शेख शानुरबी अल्लाउद्दीन, वय – ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुर्ला, ता. जि.बीड, २. रहिम अल्लाउद्दीन शेख, वय– ४९ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ३. हसीम अल्लाउद्दीन शेख, वय ३७ वर्षे, धंदा – मजुरी, रा.वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे अल्लाउद्दीन शेख पि. अहमदभाई हे / हया दिनांक २६/०९/२०२५ रोजी बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत आहेत. मयतास मुलगी नाही.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:– ०४/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख:– १२/०१/२०२६.

(मार्फत विधिज्ञ:– ॲड डी. डी. मस्के)

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १५८०/२०२५

कोमल भ्र. कल्याण मते वि. निरंक

मागणी:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्र माणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार: १.कोमल भ्र. कल्याण मते, वय: ३५ वर्षे, धंदा: घरकाम, रा. चिंचोली (माळी) पो. अंधरवणपिंप्री, ता.जि.बीड ह.मु. शुक्रवार पेठ, बीड ता. जि. बीड, २. साक्षी पि. कल्याण मते, वय: २० वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर, ३.सार्थक पि. कल्याण मते वय: १८ वर्षे, धंदा : शिक्षण रा. सदर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे कल्याण पि. संदिपान मते राहणार – चिंचोली (माळी) पो. अंथरवणपिंप्री, ता. जि. बीड हे दिनांक ०६/०६/२०२४ रोजी जिल्हा रुग्णालय बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ही मयताची मूलगी तसेच अर्जदार क. ३ हा मूलगा आहे. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे कल्याण पि. संदिपान मते यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत कल्याण पि. संदिपान मते यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख १८९/१२/२०२५ आहे.

आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

विधीज्ञ – श्री.

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ ● पान ४

## अहिल्यानगरच्या बाप–लेकाची बीडमध्ये दिवसा बंद घरांची पाहणी, रात्री घरफोडी ; मुलाला बेड्या



**बीड । प्रतिनिधी**

दिवसा बंद घरांची पाहणी करून घरफोडी करणाऱ्या एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अहिल्यानगर जिल्ह्यातून ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे केज आणि धारूर पोलिस ठाण्यांतील दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला ८ डिसेंबर रोजी गोपनीय माहिती मिळाली की, केज (संभाजी खडे यांचे घर) आणि धारूर (बाबाजी दपलजी यांचे घर) येथील दोन घरफोडीचे गुन्हे अहिल्यानगर जिल्ह्यातील वाळुंज पारगाव शिवारात राहणारे अक्षय अस्मातूर काळे आणि त्याचे वडील अस्मातूर मोहन काळे यांनी मिळून केले आहेत. पथकाने तातडीने आरोपीच्या घरी जाऊन अक्षय (वय २२) याला अटक केली. त्याने चौकशीत वडिलांसह गुन्हे केल्याची कबुली दिली. पोलिसांनी अक्षयकडून चोरीला गेलेले २९ ग्रॅम सोन्याचे दागिने, ५ तोळे चांदीचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली होंडा शाईन दुचाकी जप्त केली आहे. तर अस्मातूर काळे याचा शोध सुरू आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बांटेवाड आणि पोउपनि. स्वप्नील उनवणे (केज) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोउपनि. महेश विघ्ने, हवालदार महेश जोगदंड, राजू पठाण, भागवत शेलार, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, राजू वंजारे, बप्पासाहेब घोडके, अर्जुन यादव, मनोज परजणे, शमीम पाशा, चालक गणेश मरकडे व सिद्धेश्वर मांजरे यांनी कारवाई केली.

# राष्ट्रीय महामार्ग क्र. 548-डी अंबाजोगाई शहरासाठी नवीन बायपास रस्ता मंजूर करा

## आ. नमिता मुंदडा यांची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८–डी अहमदपूर ते पाटोदा या महामार्गावर अंबाजोगाई शहरासाठी नवीन बायपास रस्ता मंजूर करण्यात यावा अशी मागणी आ. नमिता मुंदडा यांनी केंद्रीय रस्ते व वाहतूक यमंत्री ना. नीतीन गडकरी यांच्या कडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

या संदर्भात ना. नितीन गडकरी यांना देण्यात आलेल्या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८–डी पाटोदा ते अहमदपूर हा महामार्ग माझ्या केज विधानसभा मतदार संघातील अंबाजोगाई शहराच्या मध्यभागातून जातो, अंबाजोगाई शहराची लोकसंख्या एक लाखाच्या वर असून आजूबाजूच्या खेड्यातून रोजगारासाठी सदर ठिकाणी नागरिक येत असल्याने तसेच या ठिकाणी प्रसिद्ध योगेश्वरी देवीचे मंदिर असल्याने महाराष्ट्रातून भाविक भक्त दर्शनासाठी येतात, तसेच सदर ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह नवाजलेल्या शैक्षणिक संस्था असल्याने सदर ठिकाणी मराठवाड्यातून शिक्षणासाठी विद्यार्थी येतात, त्यामुळे शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने सदर राष्ट्रीय महामार्गावर अवजड वाहनांसह, शहरासह ग्रामीण भागातील वाहनांची प्रचंड प्रमाणात वर्दळ होत आहे. त्यामुळे शहरातील ट्राफिक जाम होत असून सतत अपघात होवून निष्पाप नागरिकांचे प्राण जात आहेत. त्यामुळे अंबाजोगाई शहरासाठी नवीन बायपास रस्ता मंजूर करणे अत्यंत गरजेचे आहे. तरी बीड, जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८–डी पाटोदा ते अहमदपूर या राष्ट्रीय महामार्गावर अंबाजोगाई शहरासाठी नवीन बायपास रस्ता मंजूर करण्यात यावा, अशी मागणी आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी केली आहे.



# लोकांच्या प्रश्नांसाठी भांडणारे अमरनाना नगर पालिकेत पाहिजेच

## लढाऊ नेतृत्वाला राजकारणातून संपवण्याचे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी अमर नाईकवाडेंना पाठींबा : करण लोंढे

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्र.३ मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार अमर नाईकवाडे यांच्या विजयासाठी प्रभागातील प्रत्येकजण जीव ओतून काम करू लागला आहे. काम करत आलोयं अन् काम करत राहू या भुमिकेतील अमरनानांसाठी सर्व स्तरातून पाठींबा मिळू लागला आहे. अमर नाईकवाडे यांच्या सारख्या लढाऊ नेतृत्वाला राजकारणातून संपवण्याचे षडयंत्र रचले जात आहे. मात्र हे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी काँग्रेसचे करण लोंढे यांनी अमर नाईकवाडे यांना पाठींबा देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. लोकांच्या प्रश्नासाठी भांडणारे अमरनाना नगर पालिकेत पाहिजेच असा निर्धार व्यक्त करत प्रभागातील मतदारांनी आपल्या हक्काच्या माणसाला साथ देण्याची हीच वेळ असून सर्वांनी त्यांच्या पाठीशी उभे रहावे असे आवाहन करण लोंढे यांनी केले आहे.



बीड येथील प्रभाग क्र.३ मधील काँग्रेसचे करण लोंढे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिवसंग्राम मित्र पक्षाचे ▶▶ उर्वरित पान २ वर

### मराठवाड्यातील मदत मास, खिदमत मास जमिनींच्या मुद्यावरून...

## आ. सुरेश धस मुद्देसूद भाषणाने सभागृहाचे वेधले लक्ष

**आष्टी । प्रतिनिधी**

नागपूर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात आज आमदार सुरेश धस यांनी मराठवाड्यातील मदत मास आणि खिदमत मास जमिनींच्या मुक्ततेचा प्रलंबित प्रश्न मोठ्या जोरदारपणे मांडत सभागृहाचे लक्ष वेधले. आमदार धस म्हणाले की, या महत्त्वपूर्ण विधेयकाद्वारे मराठवाड्यातील तब्बल ७,४३,००० हेक्टर मदत मास आणि सुमारे ४,५०,००० हेक्टर खिदमत मास जमिनींच्या मुक्ततेचा मार्ग मोकळा होत आहे. हा कोणत्याही एका मतदारसंघाचा किंवा तालुक्याचा प्रश्न नाही; संपूर्ण मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील लाखो नागरिकांच्या जीवनाशी संबंधित विषय आहे असे ते म्हणाले. जमिनींच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भाष्य करताना त्यांनी निजामकालीन नोंदी, सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी केलेल्या शिफारसी, तसेच विविध समाजांच्या विस्तृत जमिनी या नोंदींत कशा गुंतल्या गेल्या याचे स्पष्टीकरण सभागृहात दिले. त्यांनी स्पष्ट केले की,मदत मास आणि खिदमत मास म्हणजे फक्त वक्फ किंवा मुस्लिम समाजाच्या जमिनी नव्हेत; मोठ्या प्रमाणात देवस्थानांच्या, हिंदू संस्थांच्या आणि विविध समाजांच्या जमिनीही या नोंदींमध्ये अडकल्या आहेत. अनेक वर्षांपासून या प्रश्नावर सातत्याने केलेल्या पाठपुराव्यात त्यांच्यावर राजकीय दबाव आणण्याचा ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● कोणीही उठून लोकप्रतिनिधींवर आरोप करणे चुकीचे : आमदार सुरेश धस



**मदत मा,खिदमत मास जमिनींच्या मुद्यावर बोलताना आमदार सुरेश धस यांनी विरोधकांवर कठोर शब्दांत टीका केली. ते म्हणाले,कोणीही उठलं आणि लोकप्रतिनिधींवर आरोप करायला सुरुवात केली. भांडण एकाचं आणि आरोप दुसऱ्यावर! घटनेला पंधरा दिवस झाले,एकही पुरावा मिळालेला नाही. मी कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहे. ते पुढे म्हणाले,उठसूट सोशल मीडियाचा वापर करून लोकप्रतिनिधीची बदनामी करणे चुकीचे आहे.**

## बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांची जयंती सर्व शासकीय कार्यालयात साजरी करण्यात यावी : नवनाथ अण्णा शिराळे पाटील



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची प्रती वर्षे प्रमाणे १२ डिसेंबर रोजी जयंती आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व शासकीय कार्यालय व शासनाच्या अंतर्गत येणारे महामंडळे,अंगीकृत उपक्रम या ठिकाणी त्यांची जयंती शासन आदेशान्वये साजरी करण्यात यावी. जेणेकरून देशाच्या व राज्याच्या अत्यंत महत्त्वाच्या कार्यालयीन कार्यामध्ये त्यांचा फार मोठा सहभाग होता. त्यांचे कार्य अतुलनीय आहे.आजही तळागाळातला वंचित बहुजन सर्व समाज घटकाला न्याय देणारे स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा उल्लेख कायम करावा लागेल. त्यांच्या जयंती निमित्त देशात व राज्यात विविध ठिकाणी वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. कोणी वैयक्तिक पातळीवर तर सार्वजनिक स्तरावर कार्यक्रम, उपक्रम राबवितात. १९९५ ला युती सरकार सत्तेत आल्यानंतर स्व. मुंडे साहेबांनी विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवून राज्यांमध्ये मोठमोठ्या प्रमाणावर विकासात्मक कामे केली. जन हिताचे निर्णय घेतले. शेतकऱ्यांचे,ऊसतोड कामगारांचे, युवकांचे, महिलांचे नेमके प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी नेहमी प्रयत्न केले.त्याच काळामध्ये राज्यात ऊर्जाची ▶▶ उर्वरित पान २ वर

## पिंपळनेर परिसरात गव्हाचे पीक जोमात ; ढगाळ वातावरणामुळे तांबेरा, तुडतुड्याची भीती

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात यावर्षी गव्हाची पेरणी मोठ्या प्रमाणात झाली आहे. मुबलक पाणी असल्याने हे पीक सध्या जोमात आले आहे. मात्र, अधूनमधून तयार होणाऱ्या ढगाळ वातावरणामुळे पिकावर तांबेरा रोग आणि तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. तालुक्यातील नाथापूर, रंजेगाव, ताडसोन्ना, जवळा, नागापूर, नाळवंडी, घाटसावळी, वडगाव ,गुंधा, घाटसावळी, आंबेसावळी, आडगाव, कुक्कडगाव, बेलवाडी, बाबुळवाडी या परिसरात गव्हाची पेरणी अधिक प्रमाणात झालेली आहे. मात्र ढगाळ वातावरणाचा या पिकावर परिणाम होण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकरी औषध फवारणी करताना दिसत आहेत. तर काही ठिकाणी गव्हाची ▶▶ उर्वरित पान २ वर

## लाडेगाव, दीपेवडगाव, लाडेवडगाव ,मुलेगाव येथील शेतकऱ्यांना उच्च दाबाने दररोज ८तास वीजपुरवठा करण्याच्या मागणीसाठी होळ सबस्टेशन वर धरणे आंदोलन संपन्न

**● धारूर उपकार्यकारी अभियंता श्री. गोकुळ मोरे ,कनिष्ट अभियंता अभिजित पाटिल यांच्या लेखी अश्वासनाने क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे आंदोलन स्थगित**

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील लाडेगाव ,दीपेवडगाव ,लाडेवडगाव ,मुलेगाव येथील शेतकऱ्यांच्या कृषिपंपाला तब्बल ३०व काही ठिकाणी ३६ तासानंतर कमी दाबाने होत असलेल्या वीज पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांचे रब्बी हंगामातील भिजवणे होत नसल्याने शेतकऱ्यांचे पिकांचे अतोनात नुकसानीमुळे शेतकरी संतप्त झाले होते.दररोज उच्च दाबाने ८तास वीज द्यावी, तसेच होळ ३३/११के.व्ही.



विद्युत उपकेंद्रांतर्गत लाडेगाव ,दिपेवडगाव ,लाडेवडगाव, मुलेगाव येथील गावठाण व कृषी फीडर ▶▶ उर्वरित पान २ वर

## तलवाडा येथील अंबिकानगर गणेश नगर ईदगाह नगर रहदारी आतिक्रमण धारकांना मालकी हक्कात पि टी आर मिळणार : शेख लालाभाई

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामपंचायत हाद्दीतील शासकीय गायरान जमिनीवर गेल्या ३० ते ३५ वर्षा पेक्षा जास्त कालावधी पासुन हजारोच्या संख्येने नागरिक कच्ची पक्की घरे बांधुन रहात आहेत. तलवाडा येथील ग्रामपंचायत प्रशासनाने या ठिकाणी रहात आसलेल्या सर्व नागरिकांना भोगवटादार म्हणून पि. टि. आर दिलेला असून पि. टि. आर च्या मालकी रकान्यात सरकार आशी नोंद केलेली आहे. केंद्र व राज्य शासन देश व राज्यभरात पि एम आवास योजना सारखे आणेक विविध उपक्रम राबवत आसल्याने या ठिकाणी रहात आसलेल्या आणेक कुटूंबियांना मालकी हक्काचा ▶▶ उर्वरित पान २ वर

# बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

सन २०२४–२५ मधे ध्वजदिन निधी संकलनामधे राज्यात बीड प्रथम आल्याबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे हस्ते बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा आज मुंबईत सत्कार करण्यात आला

माजी सैनिकांच्या कल्याणार्थ विविध योजना व उपक्रम राबविण्यासाठी दरवर्षी ७ डिसेंबर हा 'ध्वजदिन' म्हणून पाळण्यात येतो. यानुसार ७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेरपर्यंत ध्वजदिन निधीचे संकलन करण्यात येते.

देशाच्या सुरक्षेसाठी प्राणार्पण करणारे शूरवीर, सेवेत अपंगत्व प्राप्त झालेले जवान तसेच सशस्त्र दलातून सेवानिवृत्त झालेल्या सैनिकांच्या पुनर्वसनासाठी या निधीचा वापर केला जातो. याशिवाय सैनिकी



मुलांच्या वसतिगृहांचे संचालन व इतर कल्याणकारी उपक्रमांसाठीही हा निधी महत्त्वपूर्ण ठरतो. दरवर्षी शासन निर्णयानुसार लोकसंख्येच्या आधारे प्रत्येक जिल्ह्याला ध्वजनिधी संकलनाचे उद्दिष्ट दिले जाते. ध्वजनिधी–२०२४ (संकलन वर्ष २०२४–२५) या वर्षासाठी बीड जिल्ह्याला रुपये ३९,५०,०००/– (एकोणचाळीस लाख पन्नास हजार) इतके उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.

जिल्हाधिकारी व अध्यक्ष, ध्वजदिन निधी संकलन समिती यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच शैक्षणिक संस्थांना सक्रीय सहभागाचे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत बीड जिल्ह्यातील अधिकारी ▶▶ उर्वरित पान २ वर

# जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेचा क्रीडा महोत्सव 27 डिसेंबरपासून सुरु होणार: रणवीर पंडित

## युवा नेते पृथ्वीराज पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त अठराशे खेळाडूंना मोफत किट वाटप

**गेवराई । प्रतिनिधी**

जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दि.२७ डिसेंबर २०२५ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान होणाऱ्या या क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो–खो, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुध्दिबळ, जलतरण आणि थलेटिक स्पर्धा होणार असल्याची माहिती शारदा स्पोर्टस् कॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी दिली. युवा नेते पृथ्वीराज जयसिंग पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेतील अठराशे खेळाडूंना




प्रातिनिधीक स्वरुपात किटचे मोफत वाटप करताना ते बोलत होते. शारदा स्पोर्टस् कॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत असणाऱ्या विविध शाळेंच्या माध्यमातून क्रीडा महोत्सवाचे गेल्या तीन वर्षांपासून आयोजन करण्यात येते. क्रीडा महोत्सवाचे हे चौथे वर्ष असून त्यानिमित्ताने आज युवा नेते पृथ्वीराज पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या अठराशे खेळाडूंना किटचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी क्रीडा ▶▶ उर्वरित पान २ वर

### जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने बीड तालुका काँग्रेसची रविवारी बैठक

## काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्व निवडणूका ताकतीने लढण्यार : गणेश बजगुडे पाटील



**बीड । प्रतिनिधी**

आगामी होवु घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने रविवार दिनांक १४ डिसेंबर २०२५ रोजी बीड तालुका काँग्रेस पक्षाच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांची बैठक बोलावली असल्याची माहिती भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी दिली आहे. मागील अनेक वर्षांपासून काँग्रेस बीडमध्ये निवडणुका लढल्याचे दिसुन येत नाही परंतु यावेळी मात्र तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी स्वबळाचा नारा देत बीड नगर पालिका निवडणुक मोठ्या ताकतीने ▶▶ उर्वरित पान २ वर